संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# विक्रम नोंदवणारे धार्मिक पर्यटन

सध्या ज्येष्ठ अधिक महिना सुरू आहे. आणि आपल्या देशामध्ये अधिक महिना, कुंभमेळा किंवा चातुर्मास यासारखे निमित्त म्हणजे श्रद्धा आणि भक्तीच्या मोठ्या पर्वणीचे दिवस मानले जातात. महाराष्ट्रातसुद्धा जून महिना सुरू झाला की, खेड्यापाड्यापासून ते शहरापर्यंत लाखो विठ्ठल भक्तांना पंढरपूरच्या वारीचे वेध लागतात. यावर्षीचे ज्ञानोबा, तुकोबांच्या पालख्यांचे वेळापत्रकही जाहीर झालेले आहे. राज्यातून हजारो दिंड्या पंढरपुराकडे येत असतात. आषाढीच्या दिवशी पांडुरंगाच्या समचरणाचे दर्शन घेण्याकरीता ते सगळे आतुर झालेले असतात. अक्षरशः लाखो विठ्ठलभक्तांची पंढरपुरात होणारी मांदियाळी म्हणजे महाराष्ट्राच्या आध्यात्मिक पर्वणीचा तो सर्वोच्च क्षण असतो. त्यातल्या निम्म्यापेक्षा जास्त लोकांना प्रत्यक्ष पांडुरंगाचे दर्शन घेता येत नाही. पण कळसाचे दर्शन घेऊन ते समाधान मानून घेत असतात. अनेकांना तर भूलोकीचे वैकुंठ असलेल्या पंढरपुरला पाय लागले याचेदेखील खूप मोठे समाधान मिळत असते. आज संपूर्ण भारताचा विचार केला तर जवळपास प्रत्येक प्रांतामध्ये हजारोच्या संख्येने मठ-मंदिरं आहेत. आणि त्या प्रत्येक ठिकाणी आताचा अधिक मास असेल किंवा त्या त्या राज्याच्या लोकसंस्कृतीप्रमाणे सण किंवा व्रतवैकल्यांप्रमाणे वेगवेगळे उपक्रम चाललेले असतात. सगळ्या राज्यातल्या सर्व पंथांच्या भक्तांना आणखी एका गोष्टीचे विशेष आकर्षण असते. ते म्हणजे आयुष्यात आपली एकदा तरी चारधाम यात्रा झाली पाहिजे. केदारनाथ, बद्रीनाथ, गंगोत्री, जमनोत्री या चार ठिकाणी साधारणपणे एप्रिल ते जून दरम्यान विशेष गर्दी होते. याचे मुख्य कारण म्हणजे एकतर सुट्ट्यांचा कालावधी असतो. बद्रीनाथ, केदारनाथचे दरवाजे याच काळात उघडतात. अमरनाथला होणारे शिवलिंगाचे दर्शन याच काळामध्ये सुरू होते. म्हणून हा सगळा कालावधी चार धाम यात्रेसाठी अनुकूल मानला जातो. पूर्वी आताच्या इतकी सुखसाधनं नव्हती. अनेक प्रकारच्या हालअपेष्टा सहन करून चारधाम यात्रा केली जायची. म्हणूनच आयुष्याच्या शेवटी करायची ही यात्रा असादेखील त्यावेळचा समज होता.

### वाढत्या संख्येची कारणे

अलिकडच्या काळात देशभरातल्या सगळ्याच धार्मिक स्थळांना किंवा तीर्थस्थळांना जाणाऱ्यांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे. याचे ताजे उदाहरण म्हणजे यंदा एप्रिलपासून सुरू झालेली चारधाम यात्रा आणि आता केवळ तीन महिन्यांमध्ये या सर्व ठिकाणी तब्बल ३१ लाख भाविकांनी हजेरी लावल्याची आकडेवारी समोर आलेली आहे. त्यात केदारनाथला सर्वाधिक यात्रेकरू जाऊन धडकले. त्यांची संख्या ११ लाख ५ हजार ६७६ होती. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर बद्रीनाथला जाणाऱ्यांची संख्या सर्वाधिक होती. तिथेदेखील ९ लाख ८ हजार ६१९ यात्रेकरू दाखल झाले होते. गंगोत्री, यमुनोत्रीला अनुक्रमे ५ लाख २८ हजार ४०६ आणि ५ लाख ४ हजार २१ इतक्या भाविकांनी दर्शन घेतले. स्वाभाविकपणे अचानकपणे वाढलेल्या या गर्दीचे तितकेच दुष्परिणामही समोर आलेले आहेत. मग अगदी या तीन महिन्यांत १६१ भाविकांचा मृत्यू होण्यापासून तर वाहतुकीच्या कोंडीने नवा विक्रम प्रस्थापित होण्यापर्यंतचे परिणाम पाहायला मिळाले आहेत. गेल्या चार-पाच वर्षांच्या तुलनेत यंदा चारधाम यात्रेला झालेली प्रचंड गर्दी यावरून लोकांमध्ये एकूण धार्मिक पर्यटनाविषयी आकर्षण वाढते आहे. भक्ती, श्रद्धा हा भाग जरी गृहित धरला तरी वाढत्या साधनसुविधा हादेखील या वाढत्या पर्यटनाचा मोठा भाग ठरतो. पूर्वी चारधाम यात्रेला जायचं म्हणजे अक्षरशः जीव धोक्यात घालून किंवा जोखीम स्वीकारूनच जावे लागत असे. आज ती परिस्थिती राहिलेली नाही. रस्ते सुरक्षित झालेले आहेत. शिवाय कमी वेळामध्ये पोहोचण्याच्या अनेक सुविधा उपलब्ध आहेत. विमान हेलिकॉप्टरद्वारे या यात्रेसाठी जाण्यासाठी वेळ खूप वाचतो. म्हणजे एकेकाळी चारधाम करण्यासाठी चार महिने लागायचे. आज हेलिकॉप्टरमधून केवळ आठ तासांमध्ये या चारही धामची यात्रा सहज शक्य झालेली आहे. शिवाय खासगी वाहनांचा सर्वाधिक वापर होत असतो. आपण कल्पनाही करू शकणार नाही की, गेल्या तीन महिन्यांमध्ये या यात्रेसाठी एकूण २ लाख ८९ हजार वाहनांचा वापर झालेला आहे. अशा सुविधांमुळेसुद्धा हे धार्मिक पर्यटन अधिक सुसह्य झाल्याचे दिसून येते.

### पर्यटन साक्षरतेची गरज

यातला दुर्दैवाचा भाग असा आहे की, पर्यटन करणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढते आहे. पण या सगळ्या ठिकाणी पर्यटन निरक्षरता तितक्याच मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळते. कारण एकट्या केदारनाथमध्ये महिना-दीड महिन्यात जवळपास २५ हजार टन कचरा गोळा झाला. त्यामध्ये प्लास्टिकच्या बाटल्यांपासून ते प्लास्टिक पिशव्या किंवा खाद्यपदार्थांचे रॅपर्स हे तिथेच कुठेतरी रस्त्याच्या कडेला किंवा आजुबाजूला फेकून देण्याची अतिशय बेजबाबदार प्रवृत्ती निदर्शनाला आली. सरकारने जाणीवपूर्वक या धार्मिक पर्यटनाला प्रोत्साहन दिलेले आहे. परंतु तिथली स्वच्छता आणि क्षमतेपेक्षा जास्त पर्यटकांना परवानगी दिल्याने अनेक प्रकारचे धोकेही निर्माण झालेले आहेत. ही सगळी महत्त्वपूर्ण धार्मिक स्थळं उत्तराखंड राज्यात येतात. त्यातून सरकारला चांगल्या प्रकारचा महसूलही मिळतो. परंतु स्थानिक राजकीय नेतेसुद्धा या धार्मिक स्थळांचे पावित्र्य टिकवून ठेवण्यात कमी पडतात. उलट त्याचा व्यावसायिक किंवा पैसे कमावण्यासाठी कसा वापर करता येईल याकडेच त्यांचे जास्त लक्ष असते. एकीकडे पर्यटकांना आकर्षित करण्याकरीता 'अतिथी देवो भव'सारख्या जाहीराती करायच्या. परंतु त्या त्या पर्यटनस्थळांची निगा राखण्यात कोणतीच जबाबदारी पार पाडायची नाही, हे आणखीनच दुर्दैवी ठरते. यासाठी पर्यटन संस्थांची मदत शिवाय स्थानिक हॉटेल, लॉज किंवा टूरिस्ट एजन्सीज यांच्या मदतीने या सगळ्या ठिकाणांची स्वच्छता आणि पावित्र्य ठेवण्यासाठी मोठी मोहीम राबवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी पर्यटन साक्षरता राबवावी लागेल यात काही शंका नाही.